जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०६/२०२३
## दि.०८/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २५९/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | दिग्विजय मते,वय २२ वर्षे,रा.बळवंत सदन,न-हे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०२३ रोजी सकाळी ०७/१० वा.ते ०७/२० वा.चे दरम्यान बळवंत सदन,रुम नं.२,झील कॉलेज चौक,न-हे,पुणे येथील हॉल व बेडरुम मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे इतर सहकारी रुम पार्टनर हे नोकरी करतात. तसेच काही पार्टनर हे शिक्षण घेत आहेत. फिर्यादी व त्यांचे चार रुम पार्टनर यांनी बळवंत सदन,रुम नं.२,झील कॉलेज चौक,न-हे,पुणे येथील रूमचे हॉल व बेडरुम मध्ये त्यांचेकडील तीन लॅपटॉप,दोन मोबाईल व एक टॅब असे वस्तु ठेवुन दोही रुम पार्टनर रूमचे टेरेसवर व इतर रूम मधील हॉल मध्ये त्यांचा दरवाजा लोटुन झोपलेले असतांना,कोणीतरी अज्ञात चोरट्याने,सदर रूमचे उघड्या दरवाजावाटे आत मध्ये प्रवेश करुन,स्वतःच्या फायद्यासाठी तीन लॅपटॉप,दोन मोबाईल व एक टॅब असा एकुण २७०,०००/- रूपये किमतीचा ऐवज लॅपटॉप बॅगेसह चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, कुंभार ८६९८६२१३३४ / ७०५८८५५७८४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २५८/२०२३,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | महेंद्र भिरुड,वय ४० वर्षे,रा.लगडमळा,वडगाव-खुर्द सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम फिकट गुलाबी रंगाचा शर्ट घातलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०६/२०२३ रोजी पहाटे ०१/२८ वा.मियामी सोसायटी मध्ये ए/२,इमारतीच्या लिफ्ट जवळ असलेल्या कॉमन पार्किग मध्ये लगडमळा,वडगाव-खुर्द सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे राहत असलेल्या मियामी सोसायटीचे लिफ्ट जवळ असलेल्या कॉमन पार्किग मध्ये त्यांनी पार्क केलेली मोपेड तसेच इतर पार्क केलेल्या रॉयल एनफिल्ड बुलेट,मोपेड,कार या वाहनांना यातील नमुद अनोळखी इसमाने काहीएक कारण नसताना,नमुद वेळी व ठिकाणी त्याचे हाता मध्ये प्लॅस्टिकचे पिशवीतुन कोणतातरी ज्वलनशील पदार्थ घेवुन येवुन,फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे वाहनांवर टाकुन,त्यांनतर त्याचे हातातील काडीपेटीने सदर वाहनांना आग लावुन वाहनांचे एकुण २,५०,०००/- रुपये किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, गवळी ९९२३००९८५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ९४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५५ वर्षे,रा.हिंगणे खुर्द,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम, काळया व पिवळया रंगाचा चेक्सचा शर्ट परिधान केलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०६/२०२३ रोजी दु.१२/४५ वा.ते १३/२० वा.चे दरम्यान,स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा डेक्कन जिमखाना,झेड ब्रिज शेजारी,पर्ल वुमन हॉस्पीटलचे दुस-या मजल्यावर,डेक्कन,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी हे स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा डेक्कन जिमखाना,डेक्कन,पुणे या बँकेत येवुन,तेथील बँकेचे कामकाज संपवुन,त्यांचेकडील रोख रक्कम बँकेचे काऊंटरवरून घेत असताना,यातील नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादी यांची नजर चुकवुन त्यांचे जवळील १,५०,०००/- रूपये रोख रक्कम चोरी करून नेले आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.फौज. दत्ता शिंदे ७७१९०६७३७३

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** विमानतळ पो स्टे २८३/२०२३,भादविक ३०६,३४

**फिर्यादी** एक नागरीक,वय-२१ वर्षे,रा.धानोरी,पुणे

**आरोपीत** एक महिला व तीची बहीण (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** सन २०१८ रोजी ते ते दि.२३/०५/२०२३ रोजी १८/०० वा.चे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरी तसेच गणेश प्लाझा बिल्डींग,लोहगाव,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील,वय-५० वर्षे यांना यातील नमुद महिला यांनी संगनमत करून,त्यांचे वापरते मोबाईल फोनवरुन,त्यांना वेळोवेळी फोन करुन,ऑनलाईन जुगार तसेच राज्य गोवा येथे कॅसोनो जुगार खेळण्यासाठी वेळोवेळी बोलावुन त्यांना जिंकण्याचे अमिष दाखवुन,त्यांना जुगार खेळण्यास भाग पाडुन ते पैसे जिंकले असताना,त्यांना कॅश आऊट होवुन न देता ते पैसे जुगारात हरल्याने व त्यांना जुगारात फसविल्याने ते निराश होवुन,दिनांक २३/०५/२०२३ रोजी १८/०० वा.चे सुमारास गणेश प्लाझा बिल्डींग, दुसरा मजला,लोहगाव,पुणे येथे फिर्यादीचे वडील यांना नॅायलान दोरीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एम.पी.साळवी ९३७१०२०५१४

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे ११३/२०२३,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय-५९ वर्षे,रा.संभाजीनगर

**आरोपीत** अज्ञात व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०८/०६/२०२३ रोजी सकाळी ०९/५० वा.ते सकाळी १०/३० वा.चे दरम्यान गणराज चौक बालेवाडी,पुणे ते पुणे मनपा पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान मंगला थिएटरच्या बाजुस असणा-या श्रीनिवास प्युअर व्हेज हॅाटेल समोर

**तपशिल** यातील फिर्यादी हया गणराज चौक बालेवाडी,पुणे ते पुणे मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,त्यानंतर बस मधुन उतरून मंगला थिएटरच्या बाजुस असणा-या श्रीनिवास प्युअर व्हेज हॅाटेल समोर आले असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील एका पर्स मध्ये गोल प्लॅस्टिकच्या डबीत मध्ये असलेले सोन्याचे दागिने ५,८१,०००/- रु किमतीचे पर्स मधुन काढुन चोरी करून नेले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. विजय पालकर ९८९२७०९६४०

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सिंहगड पो स्टे २५६/२०२३,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय ५२ वर्षे,रा.सिंहगड रोड,पुणे

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०६/०६/२०२३ रोजी १८/५० वा.ते १९/४५ वा.चे दरम्यान पुणे स्टेशन ते संतोष हॅाल बस स्टॅाप, सिंहगड रोड,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया त्यांची मुलगी हिचेसह पुणे स्टेशन ते संतोष हॅाल बस स्टॅाप,सिंहगड रोड,पुणे असा पीएमपीएमएल बसने प्रवास करित असताना,सदर प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने,फिर्यादी यांचे नकळत यांचे जवळील पर्सची चैन उघडुन,पर्स मधील ४०००/- रुपये रोख रक्कम व इतर महत्वाची कागदपत्रे असा ऐवज चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, तानाजी शिंदे ९९२३२९३०४६

**१** **<u>दि.०९/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे २६२/२०२३,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** एक महिला,वय ३२ वर्षे,रा.भाग्योदय नगर,कोंढवा-खुर्द,पुणे

| | |
|---|---|
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०६/२०२३ रोजी रात्रौ २०/५५ वा.केदारी गार्डनचे गेट समोर वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया केदारी गार्डन वानवडी,पुणे येथे पार्किंग मध्ये त्यांची गाडी पार्क करुन केदारी गार्डन मध्ये जात असताना,केदारी गार्डन गेटचे समोर यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे सोन्याचे अर्धवट तुटलेले मंगळसुत्रा मधील दोन सोन्याच्या वाटया व चार मणी २५,०००/- रू किचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रमोद खरबडे ९८२३८७०९३२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**